www.prepp.in



**M–ESC–U–MRT**

# MARATHI (PAPER—I)

( LITERATURE )

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 250

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in Two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

---

# मराठी (प्रश्न-पत्र–I)

( साहित्य )

वेळ : तीन तास

कमाल अंक : 250

## प्रश्नपत्रिकेबाबतच्या तलक सूचना

**उत्तरपत्रिका लिहण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात**

आठ प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, तिचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहावयाचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतेली एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

www.prepp.in

## SECTION—A

**1.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशे पन्नास (*150*) शब्दांत लिहा : 10×5=50

(*a*) मानवी समाज व भाषा यांचा संबंध अतूट असतो, हे कोणकोणत्या प्रकारे सिद्ध होते?

(*b*) भाषेमध्ये सानुक्रम रचनेच्या मागे अर्थाचा एक संकेत असतो म्हणजे काय? स्पष्टीकरण करा.

(*c*) वऱ्हाडी बोलीचे प्रमुख विशेष कोणते?

(*d*) काव्यात्म भाषा कशाला म्हणतात? दैनंदिन व्यवहारातील भाषा व काव्यात्म भाषा यांत कोणता फरक असतो?

(*e*) 'म्हणी हा लोकस्वभावाचा आरसा आहे' या विधानाचे मर्म स्पष्ट करा.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) कोणत्या भाषाविषयक विचारांमुळे भाषाविज्ञानाच्या क्षेत्रात सोस्यूरची कामगिरी पायाभूत मानली जाते? 20

(*b*) प्रमाण भाषा आणि बोली यांच्या व्यवस्था सांगून त्या दोहोंतील परस्परसंबंध उलगडून दाखवा. 15

(*c*) एरवीच्या रूढ नाटकाच्या तुलनेने लोकनाट्याची वैशिष्ट्ये कोणती आहेत? विवरण करा. 15

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) तेराव्या शतकातील मराठी भाषा आणि सतराव्या शतकातील मराठी भाषा यांमध्ये कोणकोणत्या बाबतींत अंतर पडते, ते विवेचनपूर्वक लिहा. 20

(*b*) शब्दयोगी अव्यये आणि उभयान्वयी अव्यये यांमधील वेगळेपण उदाहरणे देऊन स्पष्ट करा. 15

(*c*) कर्तरी प्रयोगाचे सकर्मक व अकर्मक असे दोन प्रकार पडतात, तसे कर्मणी प्रयोगाचे सकर्मक व अकर्मक असे प्रकार का असत नाहीत, ते सांगून भावकर्तरी प्रयोगाचे वैशिष्ट्य कोणते, ते उदाहरणांसह सांगा. 15

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) लोकगीत कशास म्हणतात? 'कविता'या साहित्य प्रकारापेक्षा लोकगीत हे वेगळे कसे, ते समजावून सांगा. 20

(b) अहिराणी बोलीचे विशेष सोदाहरण सांगा. 15

(c) सामाजिक स्तर बदलला की भाषा बदलते, या भाषिक प्रवृत्तीचे विश्लेषण करा. 15

## SECTION—B

**5.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशे पन्नास (150) शब्दांत लिहा : 10×5=50

(a) महानुभावांच्या गद्य वाङ्मयरचनेमागील निरनिराळ्या प्रेरणा कोणत्या?

(b) वारकरी संतकवयित्रींच्या काव्यरचनेमधून भक्तिकाव्याचे कोणकोणते विशेष प्रकटतात?

(c) पंडित कवींची कविता ही संस्कृतमधील काव्यरचनेस अनुसरत होती, असे तुम्हांस वाटते का? सकारण लिहा.

(d) आधुनिक मराठी साहित्यनिर्मितीवर स्त्रीवादाचा प्रभाव पडला आहे, असे दाखविता येते का? उदाहरणांसह लिहा.

(e) ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य यांमधील सीमारेषा कोणती, ते नेमकेपणाने स्पष्ट करा.

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) मराठीतील सौंदर्यवादी (रोमँटिक) कवितेचा परिचय करून द्या. 20

(b) मराठी कादंबरीच्या क्षेत्रातील भालचंद्र नेमाडे यांच्या कामगिरीचे स्वरूप विशद करा. 15

(c) मराठीतील समस्याप्रधान नाटकांमधून स्त्रियांच्या कोणकोणत्या समस्या कशा प्रकारे मांडल्या गेल्या आहेत, ते सविस्तर लिहा. 15

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) साहित्य हे भाषिक व साहित्यिक संकेतांचे पालन व उल्लंघन करीत असते म्हणजे काय, ते विवरण करून सांगा. 20

(b) साहित्यसमीक्षा ही व्यामिश्र स्वरूपाची प्रवाही प्रक्रिया आहे, असे का म्हटले जाते? विवेचन करा. 15

(c) १९६० नंतरच्या काळात मराठी कथेत होत गेलेल्या बदलांचा आलेख रेखाटा. 15



Prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

*(a)* बखर वाङ्मयात इतिहास कमी आणि कल्पित अधिक, असा आक्षेप का घेतला जातो? उलगडा करा. 20

*(b)* शाहिरी कवितेला आधुनिक मराठी कवितेची पहाट असे का म्हटले गेले आहे? चर्चा करा. 15

*(c)* 'मराठीतील वास्तववादी कादंबरीची परंपरा संपन्न आहे', या विधानाने परीक्षण करा. 15

★ ★ ★

Prepp
Your Personal Exam Guide